राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना १९८२-
वर्गणीच्या दरात वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्र.गवियो-१०.०२/प्र.क्र.३०/शाहमी,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२. दिनांक: २६ जुलै,२००२.

संदर्भ:- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीओआय २०८१/७०१/एडीएम-५, दिनांक २६/४/१९८२
२)शासन निर्णय, वित्त विभाग क्र.गवियो १०८९/प्र.क्र.६६४/८९विमा, दिनांक ८/१/१९९०
३)शासन निर्णय, वित्त विभाग क्र.गवियो १०८९/प्र.क्र.६६/८९ विमा. दिनांक १४/२/१९९०.

**प्रस्तावना :**

राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना १ मे १९८२ पासून लागू करण्यात आल्यानंतर गट विमा योजनेच्या वर्गणीचे / विमा संरक्षणाचे दर १ जानेवारी १९९० पासून सुधारित करण्यात आले. त्यानंतर पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागू करण्यात आल्यानंतर देखील गट विमा योजनेअंतर्गत वर्गणीच्या दरात सुधारणा करण्यात आली नव्हती. त्या अनुषंगाने हे दर सुधारित करण्याबाबत गट विमा योजनेच्या वर्गणीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१. राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजनेच्या मासिक वर्गणीचे दर व त्यानुरुप मिळणारे लाभ यामध्ये दि.१ जानेवारी,२००२ पासून पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या दरांऐवजी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे गट विमा योजनेची सुधारित वर्गणी राज्य शासकीय कर्मचा-यांच्या जानेवारी,२००२ पासूनच्या वेतनातून वसूल करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

| स्तंभ-१ | स्तंभ-२ | स्तंभ-३ | स्तंभ-४ |
|---|---|---|---|
| वर्ग | दि.१ जानेवारी २००२ रोजी नियमित शासकीय सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्या मासिक वेतनातून वसूल करावयाची वर्गणी (रुपये) | दि.२ जानेवारी २००२ ते ३१ डिसेंबर २००२ पर्यंत नियमित शासकीय सेवेत दाखल झालेल्या कर्मचा-यांच्या मासिक वेतनातून वसूल करावयाचा केवळ विमा संरक्षणाचा हप्ता (रुपये) | शासकीय सेवेत असताना कर्मचा-याला मृत्यू आल्यास, कुटुंबियांना देय होणारी विम्याची रक्कम (रुपये) |
| गट-अ | ४८०/- (चारशे ऐंशी) | १६०/- (एकशे साठ) | ४,८०,०००/- (चार लाख ऐंशी हजार) |
| गट-ब | २४०/- (दोनशे चाळीस ) | ८०/- (ऐंशी ) | २,४०,०००/- (दोन लाख चाळीस हजार) |
| गट-क | ६०/- (साठ) | २०/- (वीस) | ६०,०००/- (साठ हजार) |
| गट-ड | ३०/- (तीस) | १०/- (दहा) | ३०,०००/- (तीस हजार) |

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी.
2 AUG 2002
शाखा
प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

२. वरीलप्रमाणे सुधारित दराने वर्गणी वसूल करताना सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक:एसआरव्ही १०९८/१६४४/प्र.क्र.२/९९/१२, दिनांक २ जुलै,२००२ अन्वये पदांच्या सुधारित वर्गीकरणानुसार संबंधीत वेतनश्रेणी ज्या सुधारित वर्गीकरणात समाविष्ट करण्यात आली असेल त्या वर्गीकरणाच्या अनुषंगाने वर्गणी वसूल करण्यात यावी. तसेच कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत किंवा सेवा अंतर्गत आश्वासीत प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिलेल्या अधिकारी / कर्मचा-यांच्या बाबतीत वरिष्ठ वेतनश्रेणीच्या अनुषंगाने त्यांच्या मूळ पदाचा विचार न करता विमा वर्गणी वसूल करण्यात यावी.

३. वरीलप्रमाणे सुधारित दर १ जानेवारी २००२ पासून लागू होतील. सुधारित दराने मासिक वर्गणीची वसूली १ सप्टेंबर २००२ रोजी देय होणा-या माहे ऑगस्ट २००२ च्या वेतनातून करण्यात येईल. जानेवारी २००२ ते जुलै २००२ या कालावधीतील सुधारित वर्गणीच्या फरकाची रक्कम बिनव्याजी समान हप्त्यात १ सप्टेंबर २००२ ते ३१ डिसेंबर २००२ या कालावधीच्या वेतनातून वसूल करण्यात यावी.

४. सुधारित दराने वर्गणी वसुली माहे ऑगस्ट,२००२ पासून लागू असल्याने जर एखादा अधिकारी / कर्मचारी माहे ऑगस्ट,२००२ किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झाला किंवा शासकीय सेवेत असताना त्याचे निधन झाले, तर यथास्थिती त्याला किंवा त्याच्या वारसाला सुधारित दराचा लाभ देण्यापूर्वी थकबाकीची रक्कम लाभप्रदानातून एकरकमी वळती करुन घेण्यात येईल.

५. दिनांक ३१ जुलै,२००२ अखेरपर्यंत जे अधिकारी / कर्मचारी सेवा निवृत्त झाले किंवा त्यांचे निधन झाले असेल त्यांना गट विमा योजनेअंतर्गत असुधारित दराने (पूर्वीच्या दराने) बचत निधी / विमा निधीचे लाभ प्रदान करण्यात यावे व अशा प्रकरणांमध्ये मासिक वर्गणीच्या फरकाची रक्कम वसूल करण्यात येऊ नये.

६. गट विमा योजनेचे सभासदत्व यापूर्वीच प्राप्त झालेल्या तसेच दिनांक १ जानेवारी,२००२ रोजी किंवा तत्पूर्वी शासकीय सेवेत "नियमितरित्या" स्थानापन्न असलेल्या परिच्छेद क्रमांक -५ मधील कर्मचारी वगळून इतर सर्व कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीच्या गटानुसार सुधारित दराने वर्गणी संबंधिताकडून जानेवारी २००२ पासून विनाव्याजी वसूल करण्यात यावी.

७. दिनांक २ जानेवारी २००१ ते ३१ डिसेंबर २००१ पर्यंतच्या कालावधीत नियमितरित्या नियुक्त झालेल्या / पदोन्नत झालेल्या कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी २००२ पासून गटविमा योजनेचे सभासद करुन घ्यावे व त्यांच्या वर्गवारीनुसार सुधारित दराने वर्गणी वसूल करण्यात यावी.

८. दिनांक २ जानेवारी २००२ ते ३१ डिसेंबर २००२ या कालावधीत शासकीय सेवेत नियमित नियुक्त होणा-या कर्मचा-यांकडून परिच्छेद-१ मधील तक्त्याप्रमाणे स्तंभ-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे केवळ विमा संरक्षणाच्या हप्त्याची वसूली करण्यात यावी. गट विमा योजनेच्या पुढील वर्धापनदिनास म्हणजेच दिनांक १ जानेवारी २००३ रोजी त्यांना गट विमा योजनेचे नियमित सभासद करुन घेवून बचत निधी व विमा निधी संरक्षणाच्या हप्त्याची रक्कम मिळून पूर्ण दराने वरील परिच्छेद-१ मधील तक्त्यातील स्तंभ-२ प्रमाणे वर्गणी वसूल करण्यात यावी.

९. गट विमा योजनेच्या वर्गणीचे दर बदलल्यामुळे बचत निधीच्या लाभ प्रदानाची परिगणना करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश अलाहीदा निर्गमित करण्यात येतील. तथापि मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यास काही कालावधी लागणार असल्याने तोपर्यंत मृत्यू, सेवानिवृत्ती, राजीनामा इ. कारणामुळे ज्यांचे सभासदत्व दि.१ जानेवारी,२००२ पासून पुढे संपुष्टात येणार आहे त्यांना बचत निधीतील संचित रकमेचे प्रदान तूर्त शासन निर्णय क्रमांक:गवियो १०.०२/प्र.क्र.९/२००२/शाहमी, दि.६ मार्च,२००२ अन्वये प्रसारित केलेल्या परिगणीतीय तक्त्यानुसार करण्यात यावे.

१०. गट विमा योजनेच्या वर नमूद केलेल्या वाढीव दराने वर्गणी वसूल करण्याच्या संदर्भात राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना १९८२ च्या नियमात आवश्यक त्या दुरुस्त्या यथावकाश स्वतंत्रपणे करण्यात येतील.

११. सर्व विभाग प्रमुखांनी सदर आदेश त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालय प्रमुख व इतर कार्यालये यांच्या निदर्शनास आणावेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.**

सु. सा. गायकवाड
सह सचिव, वित्त विभाग

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई,
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर,
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर,
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
६) अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८) राज्यपालांचे सचिव,
९) मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
१०) उप मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
११) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१२) मंत्रालयातील सर्व विभाग,
१३) सर्व विभागीय आयुक्त
१४) मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख
*१५) प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
*१६) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
*१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*१८) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
*१९) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
२१) उप मुख्य लेखा परीक्षक, कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/उप कोषागार अधिकारी
२३) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२४) जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६) संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
२७) वित्त विभागातील सर्व कार्यासने
२८) निवड नस्ती, कार्यासन-शासन हमी

* पत्राने

क्र लेखा-५/कावि-२११/२००२
जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी दि. ८/८/२००२

प्रति,
सर्व,
१) तहसीलदार
२) उपविभागीय अधिकारी
३) विशेष भू संपादन अधिकारी
४) शाखा प्रमुख
२/ पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता